# पहिली खबर

0154163

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र , जिल्हा District मुंबई , पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई पहिली खबर क्र. FIR No. ०५ , वर्ष Year २०२१ , दिनांक Date २२/०२/२०२१

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. १९८८ , कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ............ , कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day शुक्रवार , तारीख पासून Date from २२/०२/२०२१ वेळ Time दु. १०:०५ तारीख पर्यंत Date to — , वेळ Time —

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date २२/०२/२०२१ , वेळ Time १६:०० दरम्यान

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०१ , तारीख Date २२/०२/२०२१ वेळ Time 00:30

4. माहितीचा प्रकार Type of information लेखी , लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P. S. ............ , चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ............

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name बृहन्मुंबई महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापन , ठिकाणाचे नंबर No. if any ............ , गल्ली Ward जी/उत्तर , रस्त्याचे नाव Name of road धारावी

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ............ , गाव Village ............ , पोस्ट Post ............ , तालुका Taluka ............ , जिल्हा Dist. ............ , राज्य State ............

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station — , तालुका Taluka — , जिल्हा Dist. मुंबई , राज्य State महाराष्ट्र

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name यशवंत नारायणकर
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name वसंत नारायणकर
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ५४ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय , फोन नं. Phone No. 9869644689
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ............ , दिल्याचा दिनांक Date of Issue ............ , दिल्याचे ठिकाण Place of Issue ............ , (f) व्यवसाय Occupation ............
   (g) धर्म Religion हिंदू , जात Caste ............ , जनजात Sub-Caste ............
   (h) पत्ता Address गल्ली / सर्व्हे नं. Ward जी/४६-१४/१५ , घर / गाव नं. House/Name No. संत कक्कया मार्ग , फोन / मो. नं. Phone/Mo. No. ............ , पॅन नं. PAN No. ............ , वोटर्स नं. Card No. ............

   रस्त्याचे नाव Road बसवेश्वर नगर , जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place संत कक्कया मार्ग , गाव Village ............ , पोस्ट Post ............ , पो. स्टे. P. Stn. ............

   तालुका Taluka धारावी , जिल्हा Dist. मुंबई , राज्य State महाराष्ट्र , सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   श्री संभाजी मल्हारी देवकते, वय - ४१ वर्षे, धंदा - नोकरी, पद - मल निःसारण सहाय्यक नेमणूक - बृहन्मुंबई महानगरपालिका, जी नार्थ दादर, मुंबई. रा. ठी :- साईनाथ चाळ, रूम नं. ११, न्यू शिवाजी नगर, कळवा (पू), जि - ठाणे, मो. नं. 959 198739

Y.P.P.-800 Reg.-(25x6=150 Dvs.)-2-2018-PA3-(K) 829

खालील फिर्यादी श्री. यशवंत बसवंत नारायणकर, रा. डी-डी/४७-९४/९५ बसवेश्वर नगर, यशवंत ज्वलर्स, संत कक्क्या मार्ग, धारावी, मुं-१७, यांचा स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आलेला जबाब हिच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(शैलेंद्र चव्हाण)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

(यशवंत बसवंत नारायणकर)

जबाब दि. १३/०२/२०२१

श्री.यशवंत बसवंत नारायणकर, वय ५४ वर्षे, धंदा-व्यवसाय (ज्वेलर्स दुकान), पत्ता:-डी/४७-१४/१५, बसवेश्वर नगर, यशवंत ज्वेलर्स, संत कक्कया मार्ग, धारावी मुंबई १७ मोबाईल क्र. ९८६९६४४६८९

----•----

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर मागील ३० वर्षापासुन राहवयास आहे. माझे सोबत माझी पत्नी, दोन मुले त्यांच्या पत्नी व त्यांची मुले असे एकत्र रहावयास असुन माझे संत कक्कय मार्ग, धारावी येथे ज्वेलरीचे दुकान आहे. त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो.

मी राहत असलेल्या डी/४७-१४/१५, बसवेश्वर नगर, यशवंत ज्वेलर्स संत कक्कया मार्ग, धारावी मुंबई येथील घराची ड्रेनेज लाईन दुरूस्तीसाठी व त्या संबंधाने रोड खणण्यासाठी परवानगी मिळणेकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापन जी/नॉर्थ, मलनि:सारण चौकी, धारावी बिट क्र. ३/५, धारावी, मुंबई येथे दिनांक २८/१२/२०२० रोजी अर्ज दिला होता. मी यापुर्वी माझे घराची ड्रेनेज लाईन तुटली असल्याने जुनी लाईन रिपेरींगचे परमिशन घेतलेले होते. सदर परमीशनची कॉपी मी अर्जासोबत जोडलेली होती. उपरोक्त कामासंदर्भात मी यापूर्वी नमुद कार्यालयात जावून वेळोवेळी भेट दिली. परंतु कोरोनाचा प्रादुर्भाव असल्यामुळे ते माझे काम करण्यास टाळाटाळ करीत होते.

दिनांक ११/०२/२०२१ रोजी मी सदर अर्जाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापन जी/नॉर्थ, मलनि:सारण चौकी, धारावी बिट क्र. ३/५, धारावी, मुंबई येथील ड्रेनेज डिपार्टमेंटचे मलनि:सारण सहाय्यक श्री. देवकते यांच्या मोबाईल फोनवर फोन करून माझे अर्जा संदर्भात चौकशी केली असता, त्यांनी घराची ड्रेनेज लाईन दुरूस्तीसाठी व त्या संबंधाने रोड खणण्यासाठी परवानगी मिळणेकरीता रू. १०,०००/- रूपयांची लाचेची मागणी केली. तसेच मला रोड कटिंग व डिपॉझीट म्हणुन रूपये ११,५००/- भरावे लागतील असे मला सांगितले. मी त्यांना एवढे रूपये का? याबाबत विचारणा केली असता त्यांनी जी नॉर्थ विभाग, दादर येथील रोड डिपार्टमेंटचे श्री. सुर्यकांत साळुखे यांना सदरची रक्कम दयावी लागेल असे मला सांगितले. मी रू. १०,०००/- अधिक देण्यासाठी तयार नाही असे त्यांना सांगितले असता त्यांनी मला रू. ३४,५००/- भरण्यास सांगितले.

बृहन्मुंबई महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापन जी/नॉर्थ, मलनि:सारण चौकी, धारावी बिट क्र. ३/५, धारावी, मुंबई येथील मल नि:सारण सहाय्यक श्री. देवकते यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक ११/०२/२०२१ रोजी समक्ष हजर राहून लाप्रवि मुंबई कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पो.नि. चव्हाण यांनी 'जी' नॉर्थ विभाग, धारावी, मुंबई येथील श्री. देवकते हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत माझा लेखी तक्रार अर्ज स्वहस्तक्षरात लिहून घेतला व त्यावर माझी सही घेतली. त्या दिवशी बृहन्मुंबई महानगरपालिका, 'जी' नॉर्थ विभाग, धारावी, मुंबई, यांच्या कार्यालयाची वेळ संपत आल्याने पो.नि. चव्हाण यांनी माझे अर्जावर दिनांक १२/०२/२०२१ रोजी कारवाई करण्यात येईल असे सांगुन मला दिनांक १२/०२/२०२१ रोजी लाप्रवि कार्यालयात सकाळी ०७.०० वाजता येण्यास सांगितले.

पो.नि. चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे मी दि. १२/०२/२०२१ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालायात सकाळी ०७.०० वाजता हजर झालो. सदर वेळी स.पो.आ परब व दोन पंच ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात हजर होते. त्यानंतर पोनि चव्हाण यांनी दोन शासकीय पंचांशी व सपोआ परब यांचेशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून मी दिनांक ११/०२/२०२१ रोजी केलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि.चव्हाण यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. चव्हाण यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि चव्हाण यांनी दिनांक १२/०२/२०२१ रोजी पंचांसमक्ष बृहन्मुंबई महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापन, जी नॉर्थ, मलनि:सारण चौकी, धारावी बिट क्र. ३/५ येथील कार्यालयाच्या ठिकाणी माझे तक्रारीच्या

अनुषंगाने पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असुन होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि. चव्हाण यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून साधना विदयालय हायस्कुल, सिंधी कॉलनी, सायन, मुंबई येथे थांबलो. त्यानंतर मला पो.नि. चव्हाण यांनी श्री. देवकते यांचे बृहन्मुंबई महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापन जी/नॉर्थ, मलनि:सारण चौकी, धारावी बिट क्र. ३/५, धारावी, मुंबई कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. दिवटे यांचे सह पाठविले असता मल नि:सारण सहाय्यक श्री. देवकते यांची भेट झाली. त्यावेळी श्री. देवकते यांचेशी कामासंदर्भात चर्चा झाली. चर्चेदरम्यान लोकसेवक श्री. देवकते यांनी माझेकडे रू. १०,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी केली असता मी त्यांच्याकडे पैशाची व्यवस्था करण्याकरीता वेळ मागुन घेतला.

त्यानंतर मी पुन्हा साधना विदयालय हायस्कुल, सिंधी कॉलनी, सायन, मुंबई येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ आलो. पो.नि. चव्हाण यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक देवकते याने पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच इतर लोकसेवक श्री. साळुंखे यांचे नावे पडताळणी मध्ये निष्पन्न झाले. लोकसेवक याने लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझेकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. १०,०००/- (रू. २००० दराच्या ५ भारतीय चलनी नोटा) स्वत:चे ताब्यात घेतल्या. सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. पो.नि.चव्हाण यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझे डोक्यावरून डावा हात फिरवुन पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पोलीस वाहनात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावली व माझे शर्टाच्या डाव्या खिशात अलगद ठेवली. पो.नि. चव्हाण यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. दिवटे यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक देवकते यांचे बृहन्मुंबई महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापन जी/नॉर्थ, मलनि:सारण चौकी, धारावी बिट क्र. ३/५, धारावी, मुंबई येथे पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक काहि अंतर ठेवून होते. मी लोकसेवक श्री. देवकते यांच्या कार्यालयात गेलो असता लोकसेवक मिळून आले. लोकसेवक देवकते यांच्याशी कामा संदर्भात चर्चा करीत असतानाच लोकसेवक यांनी हाताने इशारा करून लाचेच्या रक्कमेची मागणी केली. लोकसेवक देवकते यांनी मागितल्यानंतर माझेकडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. १०,०००/- (रू. २००० दराच्या ५ भारतीय चलनी नोटा) त्यांना दिल्या असता त्यांनी त्यांच्या शर्टाच्या वरच्या डाव्या खिशामध्ये ठेवली. लोकसेवक देवकते यांनी लाचेची रक्कम घेतल्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अशा रीतीने माझे डावा हात केसावरून फिरवुन सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीसांनी तात्काळ लोकसेवक देवकते यांस रू. १०,०००/- लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. यातील लोकसेवक देवकते यांची पोलीस पथकाने माझे व पंचासमक्ष अंगझडती घेतली असता यांच्या अंगझडतीमध्ये लाचेच्या रक्कमे व्यतिरीक्त अन्य रू. २०,०००/- रोख रक्कम मिळून आली सदरबाबत पो.नि. चव्हाण यांनी लोकसेवक यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी खात्रीलायक माहिती न दिल्याने सदरची रोख रक्कम रू. २०,०००/- पोलीसांनी ताब्यात घेतली.

सदर वेळी पोलिसांनी त्या लोकसेवकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे संपुर्ण नाव संभाजी मल्हारी देवकते, वय-४१ वर्षे, धंदा-नोकरी, पद- मल नि:सारण सहाय्यक, नेमणुक- बृहन्मुंबई महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापन जी/नॉर्थ, मलनि:सारण चौकी, धारावी बिट क्र. ३/५, धारावी, मुंबई रा.ठि.- साईनाथ चाळ, रू.नं.११, न्यू शिवाजी नगर, कळवा पुर्व, जि.ठाणे असे असल्याचे पंचाना व पोलीस पथकास सांगितले.

पडताळणी दरम्यान श्री. साळुंखे यांचे नाव निष्पन्न झाल्याने त्यांचा सदर प्रकरणात सहभाग आहे किंवा नाही ? याची पडताळणी करण्याकरीता पो.नि. चव्हाण यांच्या सांगण्यावरून लोकसेवक श्री. देवकते यांना त्यांचे मोबाईल क्र. ९५९४१९८७३९ फोनवरून जी नॉर्थ, दादर मुंबई येथील मेन्टनेंन्स डिपार्टमेंटचे मुकादम श्री. साळुंखे यांचा मोबाईल क्र. ९६६४९७१८५९ वर फोन केला. सदर मोबाईल फोनवरील संभाषण हे डिजीटल व्हाईस रेकॉर्डवर ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे. सदर संभाषणामध्ये श्री. साळुंखे यांचा प्रत्यक्ष सहभाग असल्याचे दिसुन न आल्याने पो.नि. चव्हाण यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका, जी नॉर्थ, दादर मुंबई येथे जावुन पडताळणी करणार असल्याचे मला पंचासमक्ष सांगितले. त्याप्रमाणे मी, पंच व पोलीस पथक असे जी नॉर्थ, दादर येथील मेन्टनेंन्स डिपार्टमेंटचे मुकादम श्री. साळुंखे यांच्या कार्यालयात गेलो असता श्री. साळुंखे हे कार्यालयीन कामकाजा करीता बाहेर गेले असल्याचे समजल्याने मी माझे मोबाईल फोनवरून मुकादम श्री. साळुंखे यांच्या मोबाईल फोनवर फोन केला असता ते एक तासानंतर ऑफीसला येणार असल्याचे त्यांनी मला सांगितले. त्यानंतर मी पुन्हा एक तासाच्या कालावधीनंतर श्री. साळुंखे यांना फोन केला असता त्यांनी मला ते शाहूनगर येथे कामात व्यस्त असल्याने दोन तासानंतर ऑफीसला येणार असल्याचे त्यांनी मला सांगितले. त्यानंतर साधारण १६.०० वाजताचे सुमारास मी, व पंच पुन्हा जी नॉर्थ, दादर मुंबई येथील मेन्टनेंन्स डिपार्टमेंटचे मुकादम श्री. साळुंखे यांचे कार्यालयात गेलो व चौकशी दरम्यान श्री. साळुंखे यांचा मुलगा आजारी असल्याने ते परस्पर घरी गेले असल्याबाबतची माहिती मिळाली.

मी माझे राहते घर डी/४७-१४/१५, बसवेश्वर नगर, यशवंत ज्वेलर्स संत कक्कया मार्ग, धारावी मुंबई येथील घराची ड्रेनेज लाईन दुरूस्तीसाठी व त्या संबंधाने रोड खणण्यासाठी परवानगी मिळणेकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका 'जी' नॉर्थ विभाग येथे अर्ज दिला होता. सदर घराची ड्रेनेज लाईन दुरूस्तीसाठी व त्या संबंधाने रोड खणण्यासाठी परवानगी मिळणेकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापन जी/नॉर्थ, मलनि:सारण चौकी, धारावी बिट क्र. ३/५, धारावी, मुंबई येथील मल नि:सारण सहाय्यक श्री. देवकते यांनी माझेकडून दि. १२/०२/२०२१ रोजी रू. १०,०००/- लाचेची रक्कम स्वत:साठी स्विकारली म्हणुन माझी त्याचेविरूध्द फिर्याद आहे. माझे लोकसेवक श्री. देवकते यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाही.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मला मराठीतुन वाचून समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( शैलेंद्र चव्हाण ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ............ —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ............ —

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील सोबत नमुद फिर्यादी यांनी राहते घराचे ड्रेनेज लाईन दुरुस्तीसाठी व त्यासंबंधाने रोड खणण्यासाठी परवानगी मिळणेकरीता बृहन्मुंबई महानगरपालीका, जी नॉर्थ विभाग, दादर येथे अर्ज दिला होता. त्यासंबंधाने वाजूस आरोपी लोकसेवक यांनी पडताळणी / सापळा कारवाईच्या वेळी रु १०००० /- रुपयेची रक्कमेची मागणी करुन ते स्विकारले असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो. नि. शैलेंद्र चव्हाण, ला. प्र. वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ............

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ............ Rank ............ No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............ (3) Transferred to P. S. ............

District ............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name शैलेंद्र शिवराम चव्हाण

पदनाम Rank पोलिस निरीक्षक, ला. प्र. वि., मुंबई

तपासिक अं. चा कोड क्र. ............

Posting

Code No. of I. O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख............

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**